# प्रसिध्दी पत्रक

**श्री. बाबासाहेब चोखाजी थोरात, वय ३३ वर्ष, पोलीस नाईक, पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद (ग्रामीण) हे २५,०००/- रुपयाची लाच स्विकारल्यानंतर लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या जाळयात**

| | | |
|---|---|---|
| आरोपीचे नांव हुद्दा व पत्ता | :- | श्री. बाबासाहेब चोखाजी थोरात, वय ३३ वर्ष, पोलीस नाईक, पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद (ग्रामीण), रा. वारेगाव, ता. खुलताबाद, जिल्हा औरंगाबाद |
| गुन्हा घडला तारीख व ठिकाण | :- | दिनांक १९/०७/२०१८ रोजी पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद(ग्रामीण) |
| लाचेची रक्कम | :- | २५,०००/- रुपये |
| लाच मागण्याचा हेतु | :- | तक्रारदार यांच्या पोलीस ठाणे खुलताबाद येथे अटकेत असलेल्या मित्राची रेतीची ट्रक सोडण्यासाठी व गुन्हा दाखल करून सदर गाडीचा रिपोर्ट तहसील कार्यालयात न पाठविण्यासाठी. |

यातील तक्रारदार यांच्या मित्राच्या मालकीची रेतीची गाडी पोलीस ठाणे खुलाताबाद येथील सहायक पोलीस निरीक्षक श्री. पाटील यांनी पकडली असल्याबाबत तक्रारदार यांना त्यांच्या मित्राचा फोन आल्याने, तक्रारदार हे व त्यांचा मित्र असे पोलीस ठाणे खुलताबाद येथे जाऊन स.पो.नि. श्री. पाटील यांना भेटले असता, त्यांनी तक्रारदार यांस सांगितले की, गाडी सोडण्यासाठी मला १,००,०००/- रुपये दे व तु मला पैसे दिले नाहीस, तर तुझ्या मित्रावर गुन्हा दाखल करून, सदर गाडीचा रिपोर्ट हा तहसील कार्यालयात पाठवून जास्त फाईन करायला सांगतो, असे सांगितले. तेव्हा तक्रारदार यांच्याकडे पैसे नसल्याने, पाटील साहेब यांनी गाडी पोलीस स्टेशनला लावली व तक्रारदार यांना घेऊन सकाळी पैसे व त्यांच्या मित्राला तसेच ट्रक चालकाला घेऊन पोलीस ठाणे खुलताबादला यायला सांगितले. त्यानंतर तक्रारदार यांच्या मित्राने पोलीस ठाणे खुलताबाद येथील ओळखीचे पोलीस बाबासाहेब चोखीज थोरात यांना फोन करुन याबाबत माहिती दिली. त्यावळी श्री. थोरात यांनी सांगितले की, मी पाटील साहेबांना तुम्हाला मदत करायला सांगून गाडी पण सोडायला सांगतो असे सांगितल्याने आम्ही त्यांना हो म्हणून सांगून निघून आलो आहे. तक्रारदार यांची त्यांच्या मित्राची रेतीची गाडी सोडविण्यासाठी व गाडीचा रिपोर्ट तहसील कार्यालयास न पाठविण्यासाठी सपोनि पाटील व बाबासाहेब थोरात यांना १,००,०००/- रुपयाची लाच देण्याची इच्छा नसल्याने, त्यांनी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद येथे तक्रार नोंदविली.

सदर तक्रारीचे अनुषंगाने आज दिनांक १९/०७/२०१८ रोजी श्री. बाबासाहेब थोरात, पोलीस नाईक, पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद (ग्रामीण) यांच्याकडे पंच साक्षीदारा समक्ष लाचेची मागणीची पडताळणी केली असता, त्यांनी तक्रारदार यांच्याकडे ३०,०००/- रुपयाची मागणी करून तडजोडी अंती २५,०००/- रु लाचेची रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. त्यावरुन आज दि.१९/०७/२०१८ रोजी लाचेचा सापळा आयोजित करण्यात आला असता, श्री. बाबासाहेब चोखाजी थोरात, पोलीस नाईक, पोलीस ठाणे खुलताबाद, औरंगाबाद (ग्रा) यांनी पंच साक्षीदारा समक्ष २५,०००/- रुपये लाचेची रक्कम पोलीस ठाणे खुलताबाद येथे स्विकारल्यानंतर त्यांना रंगेहात पकडण्यात आले आहे.

**तक्रारदार यांच्याप्रमाणे नागरीकांनी भ्रष्टाचारासंबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे, असे आवाहन मा. पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, औरंगाबाद यांनी केले आहे.**

फोन क्रं. ०२४०-२३४४०५०, टोल फ्रि क्रं. १०६४
Mail ID :-१) dyspacbaurangabad@mahapolice.gov.in, २) dyspacbabad@gmail.com.

पोलीस उप अधीक्षक कार्यालय, अँन्टी करप्शन ब्युरो, औरंगाबाद
सत्यमेव जयते

**पोलीस उप अधीक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,औरंगाबाद युनिट**